म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८८.

१९०८

# मोरोपंताचा प्रभुद्रोह.

हें पुस्तक

रा. रा. कृष्णाजी पांडुरंग लिमये

यांनीं लिहिलें

तें

रा. रा शंकर नरहर जोशी

यांनीं पुणें येथें ' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

REFBK-0000389
REFBK-0000389

किंमत दोन आणे.

# प्रस्तावना.

—:*:—

पुढील लहानशी कविता अन्योक्तिपर आहे. अशाप्रकारचे कवितेंत दोन प्रकारचे अर्थ असतात. एक स्फुटार्थ व दुसरा ध्वन्यर्थ. प्रस्तुतच कवितेंत कविवर्य मोरोपंत यांच्या चरित्रातील एक विशिष्टभाग मूळ विषय म्हणून घेतला आहे. परंतु त्या मूळ विषयाचें प्रतिबिंब काव्यांत निराळेंच पडलेलें वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस येईल. जुलमी राज्यपद्धतीशीं झगडणाऱ्या कोणत्याहि राष्ट्रभक्ताच्या चरित्रांतील एक विशिष्टभाग प्रतिबिंबरूपानें प्रस्तुतच्या कवितेंत स्फुरत असलेला रसिक वाचकांस आढळून येईल. महाराष्ट्र जनांस या कवितेचें स्वरूप मर्म सहज समजावें म्हणून त्यानीं लोकमान्य टिळक यांजवर झालेल्या खटल्याची हकीगत दृष्टींसमोर ठेवून ही कविता वाचावी

प्रकाशक.

REFBK-0000389

# मोरोपंताचा प्रभुद्रोह.

## निग्रहप्रकार.

स्वभक्तभयभंजका, सकलकामनापूरका ।
विशुद्धमतिदायका, सुरसवाग्वधूकामुका ॥
नमूनि गणनायका, नवल जें सुपुप्तींत मी ।
जसें निरखिलें तसें, उमटवीन काव्यकर्मी ॥ १ ॥

तरंगततिनीं सदा, विषम सिंधुपृष्ठावरी ।
भुजंगपति विस्तरी, धवल अंग बेटापरी ॥
फणावलिमिषें तिथें, समरसिद्ध नौकावली ।
करी रिपुंस वारुनी अभय—शांतिची सांवली ॥ २ ॥

वसे सुखद त्या स्थलीं भगवती जगत्स्वामिनी ।
अमोघबलसेविनी, सकलशत्रुसंतापिनी ॥
मणिप्रवरशोभिनी, विमल—धी—कला—संगिनी ।
सुरूपगुणशालिनी, हरि—सुमूर्ति मायाविनी ॥ ३ ॥

सुमंत्रिसहिता सदा, सकल सृष्टिसूत्रांस ती ।
करीं सहज चाळवी, चरणिं वागवी श्रीसती ॥
तदीय पद—पंकजा, प्रणति पंच भूतांसही ।
अवश्य करणें पडे, अतुल ऋद्धि ही सिद्धिही ॥ ४ ॥

---

क. १ कामुकः—पति. सुषुप्तिः—निद्रा.
क. २ तरंगतिः—लाटांची परंपरा. विषमः—ओबड धोबड. सिंधुः—समुद्र. भुजंगपतिः—शेष.
क. ३ हरि सुमूर्तिः—विष्णूची सुंदर प्रतिमा.
क. ४ पदपंकजाः—चरणकमलास.

समस्त विषयांवरी, सम वसे तिची भावना ।
श्रुतिप्रकट गोष्ट ही, स्मृतिमधें दुजा भाव ना ॥
परी अधिक तीं धरी, प्रणय आर्यभूमीवरी ।
श्रुतिस्मृतिविरुद्ध ही परि खरी असे वैखरी ॥ ५ ॥
गळां पडुनि आवळी, प्रणयपाश जों जों गळा ।
अपूर्व कृतिचीं स्फुरे, अति विचित्र तों तों कळा ॥
समुद्रतलवासिनी, परमपूज्य ती देवता ।
करी भरतभूहिता स्वगत पूज्य ती देवता ॥ ६ ॥
विहार पशुच्या क्रमीं, नरपशुव्रतीं सारता ।
वदान्यवरवंचना, परमदारुणक्रूरता ॥
प्रमोद अबलावधीं, विहरणें परस्त्रीसह ।
रची विविध दोष ती, विविधरूपिणी दुःसह ॥ ७ ॥
अशा कृतिमुळें तिला, बहुत लाविती दूषणें ।
परी निमुट आयके, जणु तयां गणी भूषणें ॥
" नुरे भरतभूमिला, मजविणें दुजा आसरा " ।
तिच्या मनिं न सांपडे, इतर हेतुला आसरा ॥ ८ ॥

---

क. ५ श्रुतिः—वेद किंवा श्रवणशक्ति. स्मृतिः—स्मृति किंवा स्मरणशक्ति. वैखरीः—वाणी.

क. ६ ओळ ४, ती परमपूज्य देवता भरतभूचें हित करण्यासाठीं स्वगत ( आपल्या ठायीं असलेली ) ती ( सर्वविश्रुत ) देवता ( देवत्व ) पूज्य ( नाहींशी ) करी.

क. ७ या कवितेंत श्रीविष्णूनें निरनिराळ्या अवतारांत केलेलीं ( बाहेरून निंद्य भासणारीं ) कृत्यें वर्णिलीं आहेत. वदान्यः—दाता.

क. ८ ओळ ३, आसराः—आधार. ओळ ४ आसराः—ठाव, वास.

गमेल तिज इष्ट तें, करुनि इष्ट त्या हेतुला ।
कृतार्थ करण्या करी, श्रम-परंपरा निस्तुला ॥
परंतु तिज आडवे, अधम येति दुष्टाग्रणी ।
अनार्य जन आर्य हे, खल कृतघ्न जैसे फणी ॥ ९ ॥
सुखी सधन लोक तों, त्यजिति हा प्रभुद्वेष न ।
वळे प्रभुकडे सदा,कठिण काळ येतां मन ॥
असें मनुनि ती मनीं, प्रथम आर्यभूसंपदा ।
करी स्वपदवासिनी, मग पुढें सरे आपदा ॥ १० ॥
अवृष्टि अतिवृष्टिही, फिरति घोर साथीसवें ।
हताश जन जाहले, विपुल ढाळिती आसवें ॥
स्मशानमुखिची प्रभा, निशिदिनीं वसे कायम ।
गमे मनुजहीन ही, भरत–भू करी का यम ॥ ११ ॥
दशा भरत–भूमिची, बघुनि ती सुखा पावली ।
वदे स्वमनिं जों, ' अतां सफल वासना जाहली ' ॥
तिच्या निकट पातला, मुनिमृगेंद्र तो नारद ।
सजीव जणु पत्र जो, त्रिभुवनस्थवृत्तप्रद ॥ १२ ॥
करी सतत जो स्थिरा, भुवन–भव्य–पक्षीं मती ।
प्रणाम मुनिपुंगवा, करुनि त्या पुसे क्षेम ती ॥

---

क. ९ कृतार्थः—सफल. निस्तुलाः—निरुपमा. फणीः—साप.

क. १० ओळ ३।४, मनांत असा विचार करून तिनें प्रथम आर्य भूमींतील संपत्तीचा लोप करविला. संपत्तिनाशानंतर सर्व प्रकारच्या विपत्ति पुढें सरल्या हा भाव.

क. ११ कायमः—सतत टिकणारी

क. १२ मुनिमृगेंद्रः—मुनिश्रेष्ठ. ओ. ४ नारदमुनि म्हणजे त्रिभुवनांत घडणाऱ्या गोष्टींचें ज्ञान करून देणारें बोलतें चालतें वर्तमानपत्रच होय.

क. १३ भुवनभव्यपक्षीं:—जगाचे कल्याणाचे बाबतींत. कनक-

समस्त विषयांवरी, सम वसे तिची भावना ।
श्रुतिप्रकट गोष्ट ही, स्मृतिमधें दुजा भाव ना ॥
परी अधिक तीं धरी, प्रणय आर्यभूमीवरी ।
श्रुतिस्मृतिविरुद्ध ही परि खरी असे वैखरी ॥ ५ ॥
गळां पडुनि आवळी, प्रणयपाश जों जों गळा ।
अपूर्व कृतिची स्फुरे, अति विचित्र तों तों कळा ॥
समुद्रतलवासिनी, परमपूज्य ती देवता ।
करी भरतभूहिता स्वगत पूज्य ती देवता ॥ ६ ॥
विहार पशुच्या क्रमीं, नरपशुव्रतीं सारता ।
वदान्यवरवंचना, परमदारुणक्रूरता ॥
प्रमोद अबलावधीं, विहरणें परस्त्रीसह ।
रची विविध दोष ती, विविधरूपिणी दुःसह ॥ ७ ॥
अशा कृतिमुळें तिला, बहुत लाविती दूषणें ।
परी निमुट आयके, जणु तयां गणी भूषणें ॥
" नुरे भरतभूमिला, मजविणें दुजा आसरा " ।
तिच्या मनिं न सांपडे, इतर हेतुला आसरा ॥ ८ ॥

---

क. ५ श्रुतिः—वेद किंवा श्रवणशक्ति. स्मृतिः—स्मृति किंवा स्मरणशक्ति. वैखरीः—वाणी.

क. ६ ओळ ४, ती परमपूज्य देवता भरतभूचें हित करण्यासाठीं स्वगत ( आपल्या ठायीं असलेली ) ती ( सर्वविश्रुत ) देवता ( देवत्व ) पूज्य ( नाहींशी ) करी.

क. ७ या कवितेंत श्रीविष्णूनें निरनिराळ्या अवतारांत केलेलीं ( बाहेरून निंद्य भासणारीं ) कृत्यें वर्णिलीं आहेत. वदान्यः—दाता.

क. ८ ओळ ३, आसराः—आधार. ओळ ४ आसराः—ठाव, वास.

गमेल तिज इष्ट तें, करुनि इष्ट त्या हेतुला ।
कृतार्थ करण्या करी, श्रम-परंपरा निस्तुला ॥
परंतु तिज आडवे, अधम येति दुष्टाग्रणी ।
अनार्य जन आर्य हे, खल कृतघ्न जैसे फणी ॥ ९ ॥
सुखी सधन लोक तों, त्यजिति हा प्रभुद्वेष न ।
वळे प्रभुकडे सदा, कठिण काळ येतां मन ॥
असें मनुनि ती मनीं, प्रथम आर्यभूसंपदा ।
करी स्वपदवासिनी, मग पुढें सरे आपदा ॥ १० ॥
अवृष्टि अतिवृष्टिही, फिरति घोर साथींसवें ।
हताश जन जाहले, विपुल ढाळिती आसवें ॥
स्मशानमुखिची प्रभा, निशिदिनीं वसे कायम ।
गमे मनुजहीन ही, भरत–भू करी का यम ॥ ११ ॥
दशा भरत–भूमिची, बघुनि ती सुखा पावली ।
वदे स्वमनिं जों, ' अतां सफल वासना जाहली ' ॥
तिच्या निकट पातला, मुनिमृगेंद्र तो नारद ।
सजीव जणु पत्र जो, त्रिभुवनस्थवृत्तप्रद ॥ १२ ॥
करी सतत जो स्थिरा, भुवन–भव्य–पक्षीं मती ।
प्रणाम मुनिपुंगवा, करुनि त्या पुसे क्षेम ती ॥

---

क. ९ कृतार्थः—सफल. निस्तुलाः—निरुपमा. फणीः—साप.

क. १० ओळ ३।४, मनांत असा विचार करून तिनें प्रथम आर्य भूमींतील संपत्तीचा लोप करविला. संपत्तिनाशानंतर सर्व प्रकारच्या विपत्ति पुढें सरल्या हा भाव.

क. ११ कायमः—सतत टिकणारी

क. १२ मुनिमृगेंद्रः—मुनिश्रेष्ठ. ओ. ४ नारदमुनि म्हणजे त्रिभुवनांत घडणाऱ्या गोष्टींचें ज्ञान करून देणारें बोलतें चालतें वर्तमानपत्रच होय.

क. १३ भुवनभव्यपक्षीं:—जगाचे कल्याणाचे बाबतींत. कनक-

करीं धरुनि वैसवी कनकविष्टरीं सादर ।
वदे मग मुनी नसे, सरळ भाषणीं ज्या दर ॥ १३ ॥
जगत्रितयशासका, प्रभुवरा रमानायका ।
प्रपंचभयहारका, सकलकामनादायका ॥
प्रभो सकल जाणसी, कथिन मी परी जें तुला ।
करीं श्रवण आदरें, पुरविं या मनोहेतुला ॥ १४ ॥
करीं विधिवशें विभो, गमन आर्यभूमीप्रती ।
तुझ्या निकट पातलों, त्वरित तेथुनी संप्रती ॥
भयावह तिची दशा बघुनि मूक वाग्देवता, ।
दयारसनिधी गमे वदसि " पाववूं दे वता " १५ ॥
सुदैन्य उजवीकडे नृपति-कोप डावीकडे ।
अवग्रह उभा पुढें गदधुरीण पाठीकडे ॥
धरा पदतलीं हले वरुनि वज्र माथीं पडे ।
अशा गहन संकटीं अहह ! आर्यभू सांपडे ॥ १६ ॥
प्रिया पतिविना रडे, पति सतीविना ओरडे ।
मृतात्मज पिता घडे सुत वितात शोकीं पडे ॥
प्रसू शिशुविना झुरे शिशुस माय दूरी सरे ।
विबंधु भगिनी फिरे अनुज ती विना बावरे ॥ १७ ॥
अशौचमलिनप्रभा सकल भूमुखा सारवी ।
ग्रहग्रसनहीन कीं ग्रहणघोरवासा रवी ।

---

विष्टरीं:—सोन्याचे आसनावर. दर:—भीति.

क. १५ ' पाववूं दे वता ' आटून जाऊं दे असें.

क. १६ अवग्रह:—अवर्षण, दुष्काळ.

क. १७ मृतात्मज:-मृत झाला आहे पुत्र ज्याचा असा.प्रसू:-आई.

क. १८ ओळ १।२ सर्व भरतभूमींतील लोकांचें मुखावर अशौचाची ( सुतकाची ) मलिन प्रभा दिसूं लागली; तेव्हां असें वाटलें कीं सूर्याला केतूचा ग्रास झाल्याशिवाय

गमे गगनिं भोगतो, तुजसि अर्चना अंतरे ।
भले वदति माधवा ‘ वघसि कां पुरा अंत रे ’ ॥ १८ ॥

विपन्न जन मारिती तुजसि हांक दीनस्वरें ।
परी श्रवण झांकिशी रिझविशी न त्यां उत्तरें ॥
म्हणूनि जन बोलती उघड सर्व रागावुनी ।
प्रभूस निजवी कली हित न ईश्वरा गावुनी ॥ १९ ॥

अशेपजन–वृत्ति जों तुजकडे असे कावली ।
मयूर कवि–वर्य तों प्रगटवी स्व केकावली ॥
करूनि कवि-कीर्तिचा कळस जी तया वृत्तिचा ।
असंभव निदर्शवी उभय-संभवा-वृत्तिचा ॥ २० ॥

सदा सुरसदायिनी, चरणचारुताधारिणी ।
सुवर्णपदशालिनी, विविधदैवताधारिणी ॥
मयूरकविची कृती मजसि धेनुशी वाटते ।
कितीक वदती परी ‘ अवगुणा करी वाट ते ’ ॥ २१ ॥

श्रुति-स्मृति-पुराणिं जो सुरमुनीश्वरीं गायिला ।
विशेप महिमा असे उचित सर्व तो गायिला ॥

---

ग्रहण लागून राहिलें आहे. अर्चना:—पूजा

क. १९ विपन्न:— संकटांत सांपडलेले. रिझविशी:— आनंद देशी.

क. २० ओळ ४ त्या प्रकारची कविकीर्ति व त्याप्रकारची क्षुब्ध वृत्ति पुन्हा प्रादुर्भूत होतील हें अशक्य.

क. २१ पहिल्या दोन आळींतील विशेषणें धेनु व केकावली या दोहींकडे लागतात. रस:—दूध किंवा कवितेंतील रस. चरणचारुता:—पायांची शोभा किंवा कवितेंतील चरणांची शोभा.

क. २२ सुरमुनि:—देव व ऋषि.

अशुद्धवदनामुळें तिजसि दूषणें लागती ।
मयूरकृतिला तशी प्रभुविरोधिनीला गती ॥ २२ ॥

स्मशानसम भासलें मज महानिराशावळ ।
परिस्थिति चिता गमे, जन-विकोप उग्रानळ ॥
मयूर कवि अग्र दे स्वकृतिवायुसंधुक्षित ।
जिवंतचि जळे तुझा प्रतिनिधी जणू संस्थित ॥ २३ ॥

तुझ्या प्रतिनिधीसवें तव सुमंद-सत्ता सती ।
सजे विकल जावया, सुदृढ तोचि घे ध्यास ती ॥
समस्त जन पाहती कुतुक तें तिच्या रक्षणा ।
त्वदीयकुशलेच्छुंचा श्रमहि चालला या क्षणा ॥ २४ ॥

तुम्हांसचि कळे बरें उचित तें करा यापुढें ।
मदीय मति कायशी सकललोकरायापुढें ॥
अशा वदुनि वाणिला सुविषमुक्तता राजसा ।
अदृश्य मुनि जाहला गगनमुक्त तारा जसा ॥ २५ ॥

प्रवृत्तिमय जागृती मुनि महातपा चारण ।
करी प्रभुसि अर्पितां प्रभु यमास पाचारण ॥
करीं ग्रहणपत्रिका वितरुनी स्वनामांकिता ।
वदे धरुनि आण त्या कविस शीघ्र नामांकिता ॥ २६ ॥

---

क. २३ उग्रानल:—धगधगीत अग्नि. संस्थित:—मृत.
क. २५ सुविषमुक्तता राजसा:—शेषशायि भगवान् विष्णु त्यास.
क. २६ प्रवृत्तिमय:—व्रातमीच्या रूपाची. चारण:—वैतालिक.
ग्रहणपत्रिका:—पकडण्याचें वारंट.

करी कुवलया सदा नवरसार्पणें गार जो ।
परार्थ निजदेहही झिजवि मान्य आर्यांस जो ।
प्रसाद भुवनांतरीं विदित योग काव्यासह ।
मयूर-कविचंद्र तो ग्रहण भोगितो दुःसह ॥ २७ ॥

**जनक्षोभ.**

यदा कविस लागती ग्रहण—वेदना दुःसहा ।
तदा गजवजोनि हे सकल जाय सर्वसहा ।
जशी घनवनस्थलीं खग पशूंस जी आसरा ।
तदंतरिं सणाणतां सहज बंदुकीचा छरा ॥ २८ ॥

स्वयें ग्रहणवन्हिनें कवळिला असे तो जरी ।
तरी अधिक राग तो प्रकट सर्व लोकीं करी ।
कसास उतरे पुरा जनहितेच्छु; तन्मोचन ।
न कां झटति व्हावया सकल एक चित्तें जन ॥ २९ ॥

स्त्रिया पुरुष अर्भकें सकल-वर्गवर्णोतलीं ।
मयूरकविच्या गमे असति कीं कुटुंबांतलीं ॥
कशास वदतों " गमे " खरिंच तीं तशीं तो पिता ।
तदीय करण्या हिता तनुमनाधना ओपिता ॥ ३० ॥

---

क. २७ ही कविता कविवर्य मोरोपंत व चंद्र या दोहोंकडे लागू पडते. कुवलय:—भूमंडळ किंवा चंद्रविकासि कमळ. नवरस—नऊ शृंगारादि रस किंवा नवीन नवीन आनंद. आर्यांसः—आर्यावृत्तास किंवा सुजनांस, दुर्जन जे चोरादिक त्यांस चंद्र प्रतिकूल वाटतो. प्रसादः—कवितेंतील प्रसाद-गुण किंवा सौम्य प्रकाश. काव्यः—कविताप्रबंध किंवा शुक्रग्रह.

क. २८ सर्वसहाः—पृथ्वी.

क. २९ रागः—प्रेम किंवा लाली.

क. ३० ओपिताः—अर्पण करणारा.

३८

स्त्रिया पुरुष अर्भकें सकल-वर्ग-वर्णांतलीं ।
चुकूनि वदलों असें, अबहु गाळितों त्यांतलीं ॥
खरीं असति पूज्य तीं मिळवितां तयां सोडितां ।
न मूळ गणनेंत ये लवहि बाध कीं तत्वतां ॥ ३१ ॥
स्वपक्ष परपक्ष हा विफलपक्ष आटोपला ।
स्वजाति परजाति ही कलह शुष्क हा संपला ॥
शिशू-तरुण-वृद्ध या मिळत भेदभावा गती ।
धनी अधन सारखे जन लघू गुरू वागती ॥ ३२ ॥
विमुक्त घडतो कसा कविकुलेश या वृत्तिची ।
प्रचंड भडके शिखा प्रळय वन्हिच्या तोडिची ॥
तिनें हृदय-कुंडिच्या अखिल जाळिल्या वासना ।
म्हणूनि विषया दुजा भरतभूजनीं वास ना ॥ ३३ ॥
विचार दुसरा खळे, इतर कामना मावळे ।
दुजी न रुचि आढळे, मति न अन्य कामा वळे ॥
न अन्य नयनां कळे, वदन अन्य बोलीं खिळे ।
दुजें श्रुतिस नातळे, सकल तन्मयत्वा मिळे ॥ ३४ ॥
अवंचक चहूंकडे चतुर चार नानामिषें ।
प्रवेश करिती जनीं विविध टाकिती आमिषें ॥
मनोमय-गृहांतुनी भुरळ घालुनी वृत्तिला ।
प्रभुश्रुति-पथाचिया सतत आणिती भेटिला ॥ ३५ ॥
समस्त कळतां अशी प्रभुवरासि वस्तुस्थिती ।
मिळे विपुलविस्मयें वदनिं अंगुलीला स्थिती ॥
तटस्थ मति होतसे विलग ओष्ठही जाहले ।
तदीय हृदयीं तदा विविधभाव हे लोटले ॥ ३६ ॥

---

क. ३१ पूज्यः—मान्य किंवा शून्यासारखीं.
क. ३४ श्रुतिः—कान. नातळेः—न स्पर्शे.
क. ३५ अवंचकः—प्रामाणिक. चारः—गुप्तहेर.

' अहा सकलभूतलीं परमधन्य ती मावली ।
' विभूति उदरीं जिच्या भुवनमान्य ही मावली ॥
'परोपकृतिचें करीं रुचिर बांधुनी कांकण ।
'जिनें मिळविलें जगीं विमल कीर्तिचें आंदण ॥ ३७ ॥
' स्वदेशसमुपासने भजनिं जे तुझ्या लागती ।
'प्रभू बहुबलाढयही वचकुनी तयां वागती ॥
'प्रभूंस महती किती सकल सृष्टिची राहटी ।
'फिरे उलट द्यावया उचित धैर्य त्यां संकटीं ॥ ३८ ॥
' जरी घडति आपदा जन न सोडिती तत्पदा ।
'जरी पडति बंधनीं मिळविती यशःसंपदा ॥
'जरी न नृपलक्षणें अनभिषक्त ते भूपती ॥
'घडो मरणही तरी, अमर होउनी नांदती ' ॥ ३९ ॥
विचार लहरी अशा हृदयसागरीं घोळती ॥
असंख्य-जनपूर तों प्रभुसभोंवते लोटती ॥
' विलंब न करा प्रभो कविवरासि द्या सोडुनी ' ।
असा करुनि घोष ते गगन टाकिती कोंडुनी ॥ ४० ॥
प्रभु त्वरित वेटसा मनुजसागरें घेरिला ।
क्षण स्तिमित जाहला वश घडे जणू घेरिला ॥
सजीवलहरी परी तडक तच्छरीरावरी ।
गमे पडुनि आणिती प्रभुसि देहभानावरी ॥ ४१ ॥
सुमंत्रकुशलाग्रणी जगदधीश तो लाघवी ।
सरे न निमिषार्ध जों, नवल थोर तों दाखवी
पुरी खिळुनी टाकिली जनकरांघ्रिची चेतना ।
मुखाक्षिरसनावजा गमति चित्रसे ते मना ॥ ४२ ॥

---

क. ४१ घेरिला:—वेढिला. घेरिला:—मूर्च्छेला.
क. ४२ जनकरांघ्रि:—लोकांचे हातपाय. श्री विष्णूनें आपल्या

अनंतर उभारुनी स्वकर तो तयां लक्षुनी ।
वदे वचन तैं परी जन न आयके तें कुणी ॥
'नको इतर, सोडुनी कार्विस द्या ' अशी हांक ते ।
नभीं पसरती जिला प्रलयगर्जना लाजते ॥ ४३ ॥
स्वमंत्रबळ योजुनी प्रभु खिळी जनांचें मुख ।
सगर्व फिरवी क्रमें विजय-दृष्टि त्यां संमुख ॥
तदा कुपित-दृष्टिनें प्रखर-खड्ग धारेपरी ।
अदृश्य करिती व्रणां जन जनेंद्रदेहावरी ॥ ४४ ॥
प्रभू नयन झांकवी जन सुदीन होती तदा ।
उपाय नुरला दुजा धरिति घट्ट इच्छापदा ॥
कटु स्ववचनावली मधुलवें क्वचित् मिश्रिता ।
अशेष जनमंडला परिसवी जगत्पालिता ॥ ४५ ॥
" अहो सकल आर्यहो, अजि अनार्य का जाहलाँ ।
सुधर्मपथ सोडुनी अधममार्गि कां चाललां ॥

---

[ मागी पृष्ठावरून चालू ]

अमोघ मंत्राचा प्रयोग करून लोकांच्या चलनवलनशक्ति बद्ध केल्या तेव्हां ते चित्राप्रमाणें स्तब्ध उभे राहिले. तोंड, डोळे व जीभ यांवर मात्र लोकांची अजून सत्ता होती.

क. ४३, ४४, ४५:—हातापायांची गति रुद्ध केल्यावर श्रीविष्णु लोकांस उद्देशून बोध करूं लागले. लोक ऐकतना मोठ्यानें ओरडूं लागले. तेव्हां विष्णूनीं त्यांची वाचाशक्ति मंत्रानें रुद्ध केली. पुढें लोक क्रोधपरिपूर्ण अशी उग्रदृष्टि श्रीविष्णूचे अंगावर तीव्र खड्गधारेप्रमाणें प्रेरूं लागले. तेव्हां त्यांचे डोळे मंत्रानें मिटविले गेले. इतकें झालें तरी लोकांचे मनांतील उत्कट इष्टाभिलाष कायम होताच.

सुभक्ति तुमची सदा प्रभुपदीं असे गाजली ।
असें असुनि आज कां, त्यजुनि ती तुम्हां चालली ॥४६॥
अवश्य करणें पडे विनवणी प्रभूच्या पदीं ।
तरी विफल मार्ग हा, अनय लोटितो आपदीं ॥
चला नयन झांकुनी मदुपदिष्ट मार्गे सदा ।
तयांत हित, अन्यथा अहित, हें न मिथ्या कदा ॥ ४७ ॥
न वक्र तनु-रोमही झगडतां तिन्ही लोक हो ।
अपाय करण्या तया धजतसां कसे मूढहो ॥
विरोध करितां वृथा प्रभुसवें न हें चांगलें ।
हटें भिडुनि अग्निशीं तृण कधीं असे वांचलें ॥ ४८ ॥
मदीय-मुख—मारुतें सकल—मेदिनीमंडळ ।
उडेल गगनोदरीं विदित हें तुम्हां मद्बळ ॥
तुम्हां मशकमूर्तिची मजपुढें कथा कायशी ।
विरोध विभुचा कुणा जगांतिं या करी का यशी ॥ ४९ ॥
दशानन महाबळी प्रभुविरोध घे त्या वळी ।
वसे प्रभुवरा छळी ह्मणुनि भूतळीं तो बळी ।
प्रभूसि रिपु आकळी कुगति कंस घे आगळी ।
कुरूंस यम निर्दळी करिति जे प्रभूशीं कळी ॥ ५० ॥
असंख्य जन अन्यही प्रभुविरुद्ध जे वागले ।
कृतांतपुरिच्या पथा सकल बापुडे लागले ॥
ह्मणूनि समजा मनीं प्रभुशिं वैर जे मांडिती ।
स्वकीयवसनांचलीं निपट अग्नि ते बांधिती ॥ ५१ ॥

---

क. ४७ अनयः—अन्याय.
क. ४८ तनुरोमः—अंगावरील केंस.
क. ४९ मदीयः—मारुतेंः—तोंडच्या फुंकरानें. यशीः—यशस्वी.
क. ५० निर्दळीः—नाशी.
क. ५१ स्वकीयवसनांचलींः—आपल्या वस्त्राच्या शेवटांत.

३८

मुळीं न हृदयीं धरा प्रभुविरोधसर्पास या ।
मदुक्त उपदेश घ्या दुरित पाववी जो लया ॥
कुबुद्धि न सुचो अशी नच यशा शिवो काळिमा ।
प्रमाद पहिलाच हा 'करितसें ह्मणूनि क्षमा' ॥ ५२ ॥

तुह्मी सकल मागतां कविवरासि द्या सोडुनी ।
पसंत मज, आयका परि अटी तया लागुनी ॥
त्रिलक्ष धन राहुंद्या जन कुणी भला ओलिस ।
मदुक्त-नय रीतिनें उघड हेंचि ये ओळिस ॥ ५३ ॥

असेल जरि मान्य हें कविस देतसें सोडुनी ।
परी दिवस नेमितों हजर तो असो त्या दिनीं ॥
सदोष, गत–दोष, वा कविकृती असे ती कशी ।
यथाविधि घडेल हो उचित ती तदा चौकशी ॥ ५४ ॥

स्वमंत्र विभु संहरी प्रथम मुक्त होती जन ।
भयें जन न आदरें प्रभुसि घालिती वंदन ॥
तिथेंच धन आर्पिलें जन भला दिला त्यासवें ।
मिळे कविस मुक्तता परम हर्ष लोकां सवें ॥ ५५ ॥

## परीक्षणप्रकार.

असे जलधिवेष्टिता प्रभुपुरी जगीं विश्रुता ।
यदीय भुवनाद्भुता मतिस गुंगवी चारुता ॥
धरी रुचिर "मोहिनी" ह्मणुनि नाम जी सार्थक ।
जिला बघुनि होतसे नयनवृत्तिचें सार्थक ॥ ५६ ॥

जिला वदति आद्यभू भुवनिंच्या घडामोडिची ।
दुजी भरतभूमधें नच पुरी जिच्या तोडिची ॥

---

क. ५६ जलधि:–समुद्र.

असंख्यजनपोषणा सतत मायशी जी करी ।
कवींद्रकृति-निर्णया प्रभुसि वाटली ती बरी ॥ ५७ ॥
विशाल गगनस्पृशी, रुचिर शांत भव्याकृती ।
प्रशस्त नयमंदिर, प्रगटवी प्रभूची कृती ॥
जिथें सुर-गुरु स्वयें, स्मृति-नयप्रपंचीं कृती ।
प्रभूक्तदिनिं पातला निरखिण्या कवीची कृती ॥ ५८ ॥
महाकुतुकरश्मिनें जनसमूह आकर्षिला ।
तुडुंब नय-मंदिरीं निरवकाश तो कोंबिला ॥
उभे सदन वेष्टुनी स्थळ न ज्यां मिळे अंतरीं ।
मनुष्यमय निर्मिलें सदन तें गमे अंतरीं ॥ ५९ ॥
असंख्य-मुख-निर्गत प्रलयगर्जितासारखा ।
प्रचंड परि अस्फुट स्वरसमुच्चय स्वर्मुखा ॥
विदीर्ण सहसा करी, दचकला जणू भास्कर ।
क्षणैक म्हणुनी घडे गगनमध्यभागीं स्थिर ॥ ६० ॥
तदा सुरगुरू तसे प्रभुसि वाटले जे भले ।
नऊ चतुर पंच ते शुभनयासनीं शोभले ॥
वकील जन अन्यही प्रभुनियुक्त ते पातले ।
पवित्र कविपादही नयगृहांतरीं लागले ॥ ६१ ॥
क्षणें विलय पावला, सकल मिश्र कोलाहल ।
करी परम शांतता प्रकट पूर्ण सत्ताबल ॥
भरे कविकुलेंदुची सकललोचनीं मूर्ति ती ।
परस्परवियोग कीं, म्हणुनि पापण्या सोशिती ॥ ६२ ॥

---

क. ५८ गगनस्पृशी:—गगनचुंबित. नयनमंदिर:—कोर्ट. स्मृतिनय-प्रपंचीं कृती:—कायदेपंडित.
क. ५९ रश्मि:—लगाम.
क. ६० स्वरसमुच्चय:—मिश्र कोलाहल. स्वर्मुखा:—आकाशास.

सुशांत नयमंदिरीं धरुनि नित्यरीतिक्रम ।
घडे कविकुलेंदुचा कृतिनिरीक्षण-प्रक्रम ॥
तया श्रवण अर्पिती जन अनन्यचित्तें जसे ।
न सुस्वर नटाचिया मधुर गायना ते तसे ॥ ६३ ॥
स्वयें प्रभुविरोधिनी असुनि अन्य लोकांप्रती ।
" विरोध विभुचा करा " ह्मणुनि होय कीं सांगती ॥
मयूरकृतिला असें उघड द्यावया दूषण ।
वकील विभुपक्षिचा उठुनि बोलला भाषण ॥ ६४ ॥
नयासनविभूषणा सुरगुरो सुधीसागरा ।
अहो चतुर पंच हो उचित निर्णयातें करा ॥
वदे मधुर भाषण भ्रमद दोष—निवृत्तितें ।
वकील कविचा न तें भ्रम करो मनोवृत्तितें ॥ ६५ ॥
विचार कु-सु-पूर्व जे कविमनीं सदा घोळती ।
प्रबंधमयदर्पणीं प्रतिफलत्व ते पावती ॥
प्रमेय नयनापुढें भुवनमान्य हें राखुनी ।
कवींद्र-कृति पारखा विनवितों तुम्हांलागुनी ॥ ६६ ॥
" मला निरखितां भवचरणकन्यका आपगा ।
म्हणे अगइ ऐकिलेंहि न कधीं असें पापगा ॥
कर श्रवणिं ठेविते नुघडि नेत्र घे भीतिला ।
न घालिन भिडेस मी जरिहि कार्यलोभी तिला "॥६७॥
जयें परम घोर हा, दुरितमेरु हो जोडिला ।
पुरेल नच वाल्मिकी, तिळहि ज्याचिया जोडिला ॥

---

क. ६३ प्रक्रमः—आरंभ.

क. ६६ प्रबंधमय दर्पणीं:—काव्यरूप आरशांत. प्रतिफलत्वः—प्रतिबिंबस्वरूप.

अशा कविकुलाधमा प्रभुविरोध येना कसा ।
जया जगतिं लेखितीं, सकल-पातकीं नाकसा ॥ ६८ ॥
अजामिळ अघासुर व्रजवधू चक्री पिंगळा ।
जिहीं स्वचरितस्थळीं पिकाविला अघांचा मळा ॥
अशां स्थळ मिळे जरी प्रभुरिपूंस काव्यांतरीं ।
तिथें प्रभु-विरोध घे वसति जेविं काव्यांतरीं ॥ ६९ ॥
वरील वचनावली कविमुखांतुनी ज्या निघे ।
कसा प्रभुसुभक्त त्या उलट पक्ष मानूनि घे ॥
कळे न मुळिं हें मला थबकली मतीची गती ।
असे न भुवनत्रयीं दुरित-भक्तिची संगती ॥ ७० ॥
उणें प्रभुसि बोलणें, विफल दोष त्या लावणें ।
अभक्ष्यवश मानणें, विषयवासना लादणें ॥
न मान लव राखणें, मतिविनाश आरोपणें ।
न कोण बुध हीं म्हणे, प्रभुविरक्तिचीं लक्षणें ॥ ७१ ॥
सदोष दिसते जरी प्रभुचरित्रलीला वरी ।
विदोष परि अंतरीं जनहितावलीला वरी ॥
सुमंद-मतिला कळे कविस या न सिद्धांत हा ।
म्हणूनि गणिला असे प्रभुविरोधसिद्धांत हा ॥ ७२ ॥
निवास मिळतो अशा क्षितितळीं असंख्यां जनां ।
खरीच नुमजे जयां गहन ईश्वरी योजना ॥
परी न कविकीटसे प्रभुसि ते वृथा निंदिती ।
'अतर्क्य महिमा तुझा' म्हणुनि त्यास ते वंदिती ॥७३॥

---

क. ६९ काव्यांतरीं:—कवितेंत. काव्यांतरीं:—शुक्राचार्यांचे अंतः-करणांत.

क. ७० दुरित:—पाप.

क. ७२ प्रभुविरोधसिद्धांत:—प्रभुद्वेष करण्यास सिद्ध असलेल्या मनुष्यांत.

अशी जनमनांतुनी विमल भक्तिची निर्झरी ।
गतानुगतिनें निघे प्रभुपयोनिधीला वरी ॥
कुशब्दगिरिनीं तिला अडविण्या झटे हा कवी ।
तयां उचित योजणें प्रखर शासनाचा पवी ॥ ७४ ॥

अनादरपदक्रमें उघड ताडितो ईश्वरा ।
नसे अजुनि जन्मला त्रिभुवनीं असा मोहरा ॥
नृशंस शिशुपालही सदसदर्थवाची पदें ।
स्तवी तशिंच दूषवी छल-पटु प्रभूचीं पदें ॥ ७५ ॥

करी सकल सृष्टिचें अविरतश्रमें पालन ।
तया प्रभुसि काय हो स्तुतिविणें दुजें वेतन ॥
प्रभुस्तुतिस साच त्या कविकलंक ये आडवा ।
जगद्धननदोष तो रचितसे मनीं वागवा ॥ ७६ ॥

सयुक्तिक न ही दिसे त्रिफळशी गमे वल्गना ।
अहो सकल सभ्य हो करुं नका अशी कल्पना ॥
असे कविकुबुद्धिचे तुटति थोर तारे कसे ।
प्रचीति बघणें तरी बघुनि घ्या उतारे कसे ॥ ७७ ॥

" न पावसि म्हणोनि मी म्हणतसें तुला आळशी " ।
" पडेल समजाविशी तशि करोत कां लाजशी ? " ॥

---

क. ७४ निर्झरी:—नदी. प्रभुपयोनिधि:—प्रभुरूपीसमुद्र. पवी:—वज्र.

क. ७५ अनादरपदक्रमें:—तिरस्काररूपचरणप्रहारें. नृशंस:—दुष्ट. सदसदर्थवाची पदें:—चांगला व वाईट अर्थ भरलेल्या शब्दांनीं. छलपटु:—कपटी.

क. ७६ अविरतश्रमें:—अश्रांत श्रमानें. जगद्धननदोष:—जगाची हिंसा करण्याचें पाप.

" सदैव अपराध हे रचितसें असे कोटि गा " ।
" स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा " ।७८।
"भलें स्मरण जाहलें समयिं कंसदासी करें" ।
कशी उजरली समुज्ज्वलदया–सुधासीकरें ॥
तुम्हां स्वरिपुची तशी बटिक आवडे मत्कृती ।
नको न सजवे असा बहुत काय, मी दुष्कृती "॥७९॥
"जिणें रस पहावया प्रशिथिलीं रदीं चावलीं ।
सुवासही कळावया प्रथम नासिकीं लाविलीं ॥
तुम्हांसि शबरी तशीं बदरिका फळें दे जुनीं ।
कथा अशि असो पहा स्वचरितें तुम्हीं मेजुनी "॥८०॥
असे अमित दाखले कविकृतींत हो दाटले ।
तुम्हांस परि दाविले प्रमुख जेवढे वाटले ॥
प्रभू कविमनीं सले ठरविण्या पुरे जाहले ।
मदीय वच संपले उचित तें करा हो भले ॥ ८१ ॥
असा निपट राबुनी कपटयुक्त कोटिक्रमीं ।
करी विकट दोष तो प्रकट सर्व काव्यक्रमीं ॥
करी बिकट कार्य हें सुघटसें बसे नंतर ।
उठे उलट पक्ष त्या तिखट द्यावया उत्तर ॥ ८२ ॥
" अहो सकल सभ्य हो नयगृहांत जे पातले ।
असो नृपति रंक वा समसमान ते जाहले ॥
असें स्वमनिं वागवा रासिकवर्यता स्वीकरा ।
कवींद्रकृति पारखा मग यथार्थ जें तें करा ॥ ८३ ॥
" सदोष कविराज हा ठरविण्या उतारे दिले ।
समग्र कृतिपासुनी विलग ते जरी पाहिले ॥

---

क. ८२ सुघट:–सोपें, सुकर.

पदच्युतिविरूप ते नृपतिसे न कीं शोभती ।
यथास्थलनिवेशित प्रचुर चारुता पावती ॥ ८४ ॥
" मयूरकृतिचें करा मनन हो अशा रीतिनें ।
किती मग कळेल कीं प्रभुविरोध केला तिनें ॥
दिलें उलट बाजुनें तिजसि जें महा दूषण ।
शिशूसहि गमेल तें तिजसि थोर हो भूषण ॥ ८५ ॥
" असें परम पातकी बहुत दुष्कृती दीन मी ।
तुझ्या पतितपावना पदसरोरुहातें नमीं " ॥
पराशरसुतादिक प्रभुसि जे असें बोलले ।
तपोगगनसूर्य ते म्हणुनि पातकी जाहले? ॥ ८६ ॥
असे विनयरीति ही सकल संत जी पाळिती ।
अहंपणतृणा जिची धरुनि आंच ते जाळिती ॥
तिच्याच कविवर्य हा सरळ पातला आश्रया ।
तिथें प्रभुविरोध का प्रभुसुभक्ति ये प्रत्यया? ॥ ८७ ॥
अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा ।
जिहीं स्वचरितस्थळीं पिकविला अघांचा मळा ॥
अशां गति दिली प्रभो मज न, भाव हा प्रेमळ ।
तदुक्तिसहि दूषवि प्रभुविरोधरूपी मळ? ॥ ८८ ॥
प्रभो तुज अनन्य मी शरण धांवगा पावगा ।
अपार भवसागरा उतरुनी क्षणीं लाव गा ॥
नसे गति तुझ्याविणें धरितसें तुझी कांस रे ।
न कां मजसि पावशी सदयता तुझी का सरे ॥ ८९ ॥
असा विमल भाव जो धरुनि अंतरीं आळवी ।
प्रभूसि करुणस्वर प्रभुविरोध तो सत्कवी ॥

---

क. ८४ पदच्युतिविरूपः—पदभ्रष्ट म्हणून विशोभित. यथातः—उचितस्थळीं ठेविलें म्हणजे.

क. ८६ पदसरोरुहः—चरणकमळ. पराशरसुतः—व्यास.

करील, नच संभवे गगनपुष्पसें हें कदा ।
मनोरम कृतींत तो कुठुनि त्याचिया घे पदा ॥ ९० ॥

अहो मलयजापरी प्रभुपदाब्जसेवा-तपें ।
कुडी झिजविली जयें खरचुनी तपेंच्या तपें ॥
कमी अधिक तो जरी समयिं बोलला क्षम्य तें ।
निसर्गनियमें तया अशिच योग्यता लाभते ॥ ९१ ॥

' अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार बा हे विधी ।
श्रुतिश्चहि म्हणे सदा स्तविल आमुची कैंचि धी ॥
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ॥ ९२ ॥

अशा वचनमौक्तिकें रसिककर्ण जो तोषवी ।
प्रभुस्तुति-नदीरया अडविणार तो का, कवी ॥
असेल जरि शक्य हें मग यथार्थ ही योजना ।
मुळीं न कळली तया गहन ईश्वरी योजना ॥ ९३ ॥

जशी जनकनंदिनी, दशमुखें वनीं गांजितां ।
जशी द्रुपदकन्यका, फरफरां सभे आणितां ।
मयूरकृति ही तशी, त्रिविधताप हे जाचितां ॥
प्रभो मजसि सोडवी म्हणुनि आरडे तत्वतां ॥ ९४ ॥

कदर्यु विभवक्षयें, जननिवांचुनी बालक ।
जलारहित मीन कीं, घनजलाविणें चातक ॥
तसा प्रभुकृपेविणें, तळमळे रडे आरडे ।
तया कविकुलोत्तमा प्रभुविरोध कैसा जडे? ॥ ९५ ॥

प्रभुस्तवनशालिनी सुरसभक्तिची जी खनी ।
तुम्हां दिसतसे जरी कृति अशी प्रभुद्रोहणी ॥

---

क. ९१ मलयजः—चंदन.

क. ९३ नदीरयाः—नदीच्या ओघास.

क. ९५ कदर्युः—कृपण मनुष्य. विभवक्षयें:—धननाशानें.

सहस्रकिरणीं तपे गगनमध्यभागीं रवी ।
तया नयन झांकुनी वदतसां निशेची छवी ॥ ९६ ॥
विदोष करण्या असें, कविकुलाग्रणीची कृती ।
वकील वदला बहु, स्मृतिनयोक्तमार्गी कृती ॥
वसे मग यथास्थळीं, समुचितोपसंहार ही ।
घडे, ध्वनित जो करी, कविवरीच ये हार ही ॥ ९७ ॥
सगर्भयुवतीपरी, तदनु निर्णयोपस्थिती ।
यथासमर्थि भोगिते प्रसव-वेदनांची स्थिती ॥
" सदोष " " गतदोष " वा जनन उक्तिं घे कोणती ।
समग्र जन उत्सुक, स्तिमित होउनी पाहती ॥ ९८ ॥
" सदोष " विषमोक्ति ही, प्रखर शस्त्रधारेपरी ।
सुविव्हळ जनां करी, हृदयमर्मभागा चिरी ॥
मिळे वसति बंधनी, कविस सार्ध संवत्सर ।
गिळी सुकविरत्न हें अनयमत्स्य हो दुर्धर ॥ ९९ ॥
सुदीन कविची दशा, सहचरी विजेची घडे ।
क्षणें गमन ती करी, भरतभूंत चोहींकडे ॥
प्रचंड-पविपातशी, श्रवणिं आदळे ज्याचिया ।
हरी प्रबळ मूर्छना, सकळ वृत्तिला त्याचिया ॥ १०० ॥
कवीन्द्र गतिची कथा सकल वृत्त-पत्रांवरी ।
बसूनि सुखरूप ही गमन सर्व ठायीं करी ॥
तदादर करावया पथिं पथीं जनांचे थवे ।
समुत्सुक उभे तया इतर कांहिंही नाठवे ॥ १०१ ॥

---

क. ९६ छवीः—कांति, प्रभा.

क. ९८ सगर्भयुवतीः—गरोदर स्त्री

क. १०० सहचरी विजेची घडिः—विद्युत्प्रवाहानें चालणाऱ्या तारायंत्रानें जिकडे तिकडे कळली.

क्र. ३६३

अपूर्व युतियोग जो बहुत दीर्घ काळें घडे ।
अनन्यमतिनें जसे गणक पाहती त्याकडे ॥
सहस्रपट त्याहुनी अधिक एकचित्तें जन ।
कविप्रकरणा निजा करिती दृष्टिचें भाजन ॥ १०२ ॥
घडे धनिक-मंदिरीं श्रुतिस गोड तद्वाचन ।
अहो श्रवण-लालसा! मज तिचें न हो वर्णन ।
निरुद्ध करुनी तदा दळणकांडणाची क्रिया ॥
तया श्रवण अर्पिती श्रवणलुब्ध शूद्रास्त्रिया ॥ १०३ ॥

## आर्यभूचा शोक.

सदा भरतभूमिचें हृदय दुःखदाहें द्रवे ।
सुतप्त नयनाश्रुच्या गतिवशें जणूं तें स्रवे ॥
घडे म्हणुनि शून्य तें मग कशी न हो शून्य ती ।
मनोरथमयी सुधा सतत तेथ जी नांदती ॥ १०४ ॥
शरीर कृशता धरी, वदन पांडुता स्वीकरी ।
रुची न रसना वरी, लवहि अन्न पाण्यावरी ॥
न हस्त पद वा करी, उचित आपुली चाकरी ।
न वस्त्र नग आदरी, विकळ आर्यभू-सुंदरी ॥ १०५ ॥
स्वदेशहिततत्परा अतुल बुद्धिच्या सागरा ।
अहा शुभगुणाकरा, विमल कीर्तिच्या आगरा ॥
अहा कविधुरंधरा, सकळ शोभवीशी धरा ।
मदीय कुशिचा हिरा मजसि नित्य तूं आसरा ॥ १०६ ॥

---

क. १०२ युति:—दोन ग्रहांचा संयोग. गणक:—ज्योतिषी. ओळ ४ कवि प्रकरणासंबंधींची हकीकत वाचीत असत हा आशय.
क. १०३ लालसा:—उत्कट इच्छा. निरुद्ध करुनी:—थांबवून.
क. १०४ मनोरथमयी सुधा:—आशांकुर रूपी अमृत.
क. १०५ नग:—दागिने.
क. १०६ आकर:—खाण.

सदीन तुजवीण मी असुविणें जशी बा कुडी ।
रुतें व्यसनकर्दमीं अहह ! गायशी बापुडी ॥
बहू कुदिन कंठिले तुजकडे बघोनी पहा ।
परी मम विपत्तिचा अजि घडे कडेलोट हा ॥ १०७ ॥
" करूं छळ तुझा वृथा " प्रभुमनांत होतें जरी ।
किमर्थ नयनीतीचा विफल थाट केला तरी ॥
असाच अथवा असे उचित राजनीतिक्रम ।
अनीतिंत सुनीतिचा उदय पाववावा भ्रम ॥ १०८ ॥
अहा कविवरा मिळे, तुजसि कोरडी भाकरी ।
सदन्न मजला गमे, म्हणुनि कालकूटा परी ॥
तनूस कपडे तुझ्या, अशुभ तोकडे लाभती ।
मदीय बरवे तरी, कफनसे मला वाटती ॥ १०९ ॥
कशी कुसुम कोमला तुजसि नीज ये फत्तरीं ।
असें शयनकंटकीं भ्रमत याचिया उत्तरीं ॥
स्वरूप तव साजरें अजि विरूप झालें खरें !
असें स्मरण होउनी मजसि बा भरे कांपरें ॥ ११० ॥
कवे कुदिन कंठिशी कठिण कामकाजीं कसे ।
तुला न सणवार तो विदित बंधनीं बा असे ॥
विषादविष यामुळें हृदयसंपुटीं दाटतें ।
मदीय सुख शांतिचे दिवस चालले वाटतें ॥ १११ ॥
महा कुशल सर्वदा गलितधैर्यसंजीवनी ।
असा उमटला तिच्या हृदयिं शून्य आशाध्वनी ॥
" अर्पील विभुच्या पदीं कविकुलेश मुक्तिस्तव ।
करीं भरत भूमि गे " म्हणुनि जो करी प्रस्तव ॥ ११२ ॥

---

क. १०७ व्यसनकर्दमीं:—संकटरूप चिखलांत.
क. ११२ प्रस्तव:—उपक्रम.

३५

कविप्रकरणीं तिचा व्यय अपार पूर्वीं घडे ।
न कोशसदनीं तिला धन अवश्य तें सांपडे ॥
सुवर्ण तनुची त्वचा म्हणुनि आपुल्या सोडवी ।
अपील करण्यास जो उचित खर्च तो चालवी ॥ ११३

अहर्निश अखंड ती, बहु परिश्रमांतें करी ।
भगीरथहि पाहुनी, वदनिं अंगुलीतें भरी ॥
परी विफल जाहला, सकलही खटाटोप तो ।
प्रभूस कविदंड कीं उचित सर्वथा वाटतो ॥ ११४ ॥
प्रयत्नगति खुंटतां प्रभुवरी बहू कोपली ॥
दुजें करिल काय ती? रडुनि शांतता पावली ॥
तशीच भरतावनी परम संकटो-द्वेजित ।
अधीर कविदर्शना दिवस बैसली मोजित ॥ ११५ ॥
" हटें कृतिस आपुल्या जडविला सुदोषग्रह ।
असंशय विदोष ती " दृढ असा कवीचा ग्रह ॥
सुखें स्वसदनीं तसे दिवस बंधनीं तो क्रमी ।
न चित्त, तनु सांपडे अनयदत्त दण्डक्रमीं ॥ ११६ ॥
शरार्त हरिणी जशी उलटते शिकारीवरी ।
करील मजशी अतां भरतभूमिही त्यापरी ॥
सदैव भयबंधनीं प्रभु अशा पडे त्याजशीं ।
कवीन्द्र सुटल्याविना सुखद मुक्ति लाभो कशी ॥ ११७ ॥
सरे पडुनि बंधनीं कविस एक संवत्सर ।
" विमुक्त कवि जाहला " सुखदवर्ण तों सुंदर ॥
महत्व बहु आणिती सकल वृत्तपत्रांप्रती ।
सुवर्ण सम कानते मुदित दृष्टिला वाटती ॥ ११८ ॥

---

क्र. ११५ परमसंकटोद्वेजितः—अत्यंत दुःसह अशा संकटानें

आर्यावर्तांत साऱ्या श्रुतिसुख सनया चौघडे वाजताती ।
होई दाटी गुढ्यांची प्रमुदित जन ते शर्करा वांटिताती ॥
ब्रह्मानंदाहुनीही सकल जन-मनीं थोर आनंद झाला ।
ज्याच्या मुक्तिप्रसंगें वदति जन असो आयुरारोग्य त्याला ॥ ११९

**अनुष्टुप.**

त्याच कोलाहलें वाटे जागृती मज लाभली ।
अमूर्त स्वप्नलीला ती शब्दमूर्तींत गोंविली ॥ १२० ॥

**पृथ्वी.**

स्फुटप्रतिफलच्छलें सकलदेशभक्ताग्रणी ।
कृतीस मम भूषवी ' टिळक ' वंशचूडामणी ।
म्हणूनिच हरील ती भरतभूजनांच्या मना ।
अलंकृति दुजी नसे तिज नसो, तिचें काम ना ॥ १२१ ॥

**मंदाक्रांता.**

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
तुम्हां राधारमणकविचे बोल लागोत गोड
तेणें माझी श्रमपरिवृता वाग्वधू विश्रमास
सेवोनीयां, वरिल मुदिता अन्यकाव्यप्रयास ॥ १२२ ॥

REFBK-0000389
REFBK-0000389

**...ार.**